अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

कृष्ण जन्माष्टमी

दही हंडीच्या शुभेच्छा

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. ७ सप्टेंबर २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३३९ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# कुणबी दाखल्यांसाठी वाढल्या हालचाली

# धनगर समाजानेही मूठ आवळली

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माफीनाम्यानंतर मराठा आरक्षणावर पेटलेला आंदोलनाचा वणवा शांत होईल, असे वाटले होते मात्र तशी चिन्हे दिसत नाहीत. उलट हा वणवा भडकत चालला आहे. अजूनही राज्यभर आंदोलने सुरूच आहेत. हे कमी म्हणून की काय? धनगर समाजाने देखील आरक्षणाच्या मागणीसाठी बुधवारपासून चौंडी येथे उपोषण सुरू केले आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी महायुतीच्या सरकारने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा पर्याय पुढे आणला आहे पण त्यालाही कडाडून विरोध होतो आहे. ओबीसी कोट्यातील आरक्षण देवू नये, या मागणीसाठी हा वर्गही रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे महायुतीचे सरकारच चांगलेच पेचात सापडले आहे. दरम्यान जालन्यात उपोषणकर्ते मनोज जरांगे-पाटील यांची प्रकृती खालावल्याने त्यांच्या कुटुंबियांकडून चिंता व्यक्त झाल्यामुळे महायुतीच्या सरकारवरचा तणावही वाढला आहे.**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत एक निर्णय घेतला की ज्यांच्याकडे महसुली, शैक्षणिक किंवा इतर ज्या नोंदी, निजामकालीन नोंदी असतील त्यांना कुणबी दाखले दिले जातील. दाखले देण्यासाठी जी कार्यपद्धती आहे, त्याची पडताळणी करण्यासाठी निवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे आणि इतर पाच लोकांची समिती स्थापन केली आहे,असे शिंदे यांनी सांगितले.

ज्या काही नोंदी पूर्वीच्या महसुली, शैक्षणिक नोंदी निजामकालीन आहेत त्याच्या पडताळणीचे आणि तपासणीचे काम समिती करेल. निवृत्त न्यायमूर्तींना महसूल विभाग मदत करेल. यानंतर निवृत्त न्यायमूर्तींची समिती एका महिन्यात अहवाल देईल. यानंतर कुणबींचे दाखले मिळतील. आम्ही हैदराबादच्या अधिकाऱ्यांशी देखील चर्चा करणार आहेत, असेही त्यांनी सांगितले. शासनाचे प्रयत्न सुरू असताना जरांगे यांनी आंदोलन मागे घ्यावे असे आवाहनही त्यांनी केले.

मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळावे, यासाठी प्राणांतिक उपोषणाला बसलेल्या जरांगे-पाटील यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत आहे. गेल्या ९ दिवसांपासून त्यांनी काहीही खाल्लेले नाही. त्यांना खूपच अशक्तपणा आला आहे. डॉक्टरांकडून त्यांना सलाईन दिले गेलंय.

संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांना पाठिंबा वाढतो आहे. दरम्यान, जरांगे पाटलांच्या कुटुंबियांनीही त्यांना धीर दिला आहे. प्रकृती खालावली असल्याने सरकारने लवकरात लवकर आरक्षणाचा निर्णय घेऊन त्यांचे उपोषण सोडवावे, असे साकडे कुटुंबियांनी सरकारला घातले आहे.

## सरकारची भंबेरी उडाली



### जरांगे काय म्हणाले?



महाराष्ट्रातील मराठा समाजाला वंशावळी ज्यांच्याकडे असतील, त्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचा जीआर काढला आहे. महाराष्ट्रातील मराठा समाजाला सरसकट कुणबी दाखला देण्यासाठी एक महिन्याचा कालावधी सरकारने मागितला आहे. निजामकाळातील आरक्षण होते तसेच्या तसे लागू करण्यात येईल , या तीन मुद्यावर आम्ही चर्चा करणार आणि आज गुरूवारी सकाळी अकरा वाजता निर्णय जाहीर करु, असे जरांगे यांनी म्हटले आहे. मराठवाडा विभागात ८ हजार ५५० गावे आहेत. आठ जिल्ह्यातील जवळपास ८० गावांमध्ये मराठा हे कुणबी असल्याचे पुरावे सापडल्याचा दावा केला जात आहे.

### धनगर समाजाने देखील मूठ आवळली...

मराठा आरक्षणासाठी जालना जिल्ह्यात आंदोलन आक्रमक बनले असताना आता धनगर आरक्षणाचा प्रश्नही पेटला आहे. यशवंत सेनेच्या वतीने धनगर आरक्षणाच्या मागणीसाठी बुधवारपासून नगर जिल्ह्यातील चौंडीत बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले आहे. संसदेच्या विशेष अधिवेशनात महाराष्ट्रातील धनगर समाजाचा अनुसूचित जमाती (एस.टी. प्रवर्ग) आरक्षणासाठीचा वटहुकुम काढावा, त्याशिवाय मागे हटणार नाही, असा इशारा यशवंत सेनेचे राज्यमंत्री व महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब दोडतले यांनी दिला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपची सत्ता येण्यापूर्वी दिलेल्या आश्वासनाची आठवण करून देत या आंदोलनातही फडणवीस यांनाच लक्ष्य केल्याचे आढळून आले. आंदोलनात अहिल्यादेवी होळकर यांचे मूळ वंशज अक्षय शिंदे पाटील, बाळासाहेब दोलतडे, माणिकराव दांगडे (बारामती), आण्णासाहेब रूपनवर, (माळशिरस), गोविंद नरवटे (लातूर), सुरेश बंडगर (परभणी), समाधान पाटील (जळगाव), नितीन धायगुडे (नातेपुते), किरण घालमे (इंदापूर), बाळा गायके (बीड), चौंडीचे सरपंच सुनील उबाळे, विलास जगदाळे, संतोष कुरडुले, अजित उबाळे, अजित शिंदे, अतिष शिंदे, अमोल उबाळे, गणेश उबाळे सहभागी झाले आहेत.

# वाखरीमध्ये महिलेचा खून

सुराज्य/पंढरपूर




तालुक्यातील वाखरी येथे शेतामध्ये वृद्ध महिलेचा मृतदेह आढळून आला असून मृतदेहावरील जखमावरून धारदार शस्त्राने हल्ला करून खून केला असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला.

वाखरी हद्दीत असलेल्या शहीद कुणालगिर गोसावी स्मारकाच्या नजिक उसाच्या शेतामध्ये मालन किसन ढाळे (वय ६५) या महिलेचा मृतदेह बुधवारी दुपारी आढळून आला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. सदर मृतदेहाच्या डोक्यावर, पाठीवर जखमा असल्यामुळे खून झाला असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मयत मालन ढाळे यांना दोन मुले असून यापैकी एक मुलगा भारतीय सैनिक दलात होता.

दरम्यान घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, प्रशिक्षणार्थी उपविभागीय पोलीस अधिकारी रोहिणी बनकर यांच्यासह ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी तातडीने धाव घेतली. याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी भोसले यांनी सदर मृतदेहावरील जखमा या धारदार शस्त्राने केल्या असल्याचा प्राथमिक अंदाज असल्याची माहिती दिली. मृतदेहाचे शविच्छेदन झाल्यानंतर व अधिक तपास केल्यानंतरच या प्रकरणी अधिक माहिती हाती येईल असे सांगितले.

# लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार; तरुणावर गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

मैत्रिणीच्या माध्यमातून निर्माण झालेल्या ओळखीचे रूपांतर प्रेमात होऊन त्यानंतर लग्नाचे आमिष दाखवून गेल्या पाच वर्षापासून शहरात व शहराबाहेर विविध लॉजमध्ये नेऊन अत्याचार केल्याप्रकरणी एका तरुणाच्या विरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची हकीकत अशी की,मैत्रिणीच्या माध्यमातून ओळख झाल्यानंतर त्या ओळखीचा फायदा घेत आरोपी राजेश परशुराम मदरी (रा. सोलापूर) त्याने प्रेम संबंध वाढवले आणि लग्नाचे आमिष दाखवून शहरातील बाळे रोड, अक्कलकोट रोड, पुणे येथे राहत असलेल्या ठिकाणी नेऊन वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले.प्रत्येक वेळी लग्नाची विचारणा केली असता नोकरी लागल्यानंतर आपण लग्न करून असे म्हणून फसवणूक केली.काही दिवसांनी त्याचा मोबाईल बंद लागला असता त्याच्या घरी जाऊन चौकशी केली असता त्याने लग्न करून पुण्यात घर थाटले असल्याचे कळले.आपली फसगत झाल्याचे कळले असता त्या पीडित तरुणीने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# मांत्रिकाच्या सांगण्यावरून अंधश्रद्धेपोटी दोन वेळा गर्भपात

## १७ महिन्यानंतर २४ जणांवर गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

मांत्रिकाच्या सांगण्यावरून अंधश्रद्धेपोटी दोन वेळा गर्भपात केल्याप्रकरणी २४ जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ५ मार्च २०२२ रोजी शोभादेवी नगर नई जिंदगी येथे घडली. याप्रकरणी आदम रियाज शेख (वय-२९,रा.वाकड हिंजवडी रोड भुजबळ वस्ती पुणे) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून फिर्यादी यांचे सासरे रफिक इमामसाब फुलमाडी, सासू शबाना रफिक फुलमाडी, मेव्हणा सद्दाम रफिक फुलमाडी व फिर्यादी यांची पत्नी शाईन आदम शेख (सर्व.रा.विजयनगर,कुमठा नाका, सध्या - व्हिजन ९ मॉल च्या मागे लेबर कॅम्प पिंपळे सौदागर,पुणे) यांच्यासह २० जणांविरुद्ध तब्बल १७ महिन्यानंतर (दि.५ सप्टेंबर २०२३) गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की,वरील संशयित आरोपी सासरे,सासू,मेव्हणा व पत्नी असे नातलग असून फिर्यादी यांची पत्नी शाईन या फिर्यादीकडे नांदत असताना त्यांचा दोन वेळा तीन महिन्याचे गरोदर असताना फिर्यादी यांचे सासरे,सासू व मेव्हणा यांनी कोणत्यातरी मांत्रिकाच्या सांगण्यावरून अंधश्रद्धेपोटी दोन वेळा गर्भपात केला. याबाबत फिर्यादी यांनी विचारणा केली असता या घटनेविषयी वाद सुरू होता. दि.५ मार्च २०२२ रोजी याबाबत शोभादेवी नगर येथील शाईन यांच्या आजोबांच्या घरी बैठक ठरली होती.त्यानुसार फिर्यादी,फिर्यादी यांचे आई-वडील,बहीण,भावजी व इतर ८ लोक असे मिळून आले होते.

त्यावेळी वरील संशयित आरोपी व इतर ३० ते ३५ लोक हजर होते.त्यावर तेथे असलेल्या मौलाना याने फिर्यादीस तुम नमाज पडते क्या असे म्हणत तुम मुस्लिम हो हिंदू जैसे क्यू हरकते करते हो असे म्हणाल्यावर फिर्यादी यांचा मेहुना सद्दाम फुलमाडी याने फिर्यादी व त्यांच्या वडिलांना शिवीगाळ केली. त्यावेळी फिर्यादी यांनी मुझे बताओ मेरी बीबी का दो बार क्यू गर्भपात किया,मेरे बच्चे को क्यू मारा.यावर फिर्यादी यांचे सासरे रफिक यांनी दरवाज्याला कडी लावण्यास सांगितले. तुम्हारे को आज जिंदा नही छोडेंगे असे म्हणून संशयित आरोपी यांनी मिळून फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने मारहाण केली.

त्यावेळी फिर्यादी यांचे वडील बेशुद्ध पडले. त्यानंतर फिर्यादी यांची आई रुकसाना यांनी फिर्यादीस सांगितले की,त्यांच्या गळ्यातील अर्ध्या तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र सद्दाम याने इसका मारून ओढून घेतले आहे. फिर्यादीचे सहा तोळ्याचे चांदीची चैन व खिशातील पाकिट,रोख रक्कम,एटीएम कार्ड,मतदान कार्ड व इतर कागदपत्रे काढून घेतल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक साळुंखे हे करीत आहेत.

# भाजप शहर कार्यकारिणी ठरली; घोषणा मात्र उरली

सुराज्य/सोलापूर

## निवडीला नाराजीनाट्याचे ग्रहण?

भाजपच्या शहराध्यक्षपदी नरेंद्र काळे यांची नियुक्ती होऊन महिना झाला आहे. मात्र अद्याप त्यांनी नवी कार्यकारिणी जाहीर केली नाही. मिळालेल्या माहितीनुसार पदाधिकाऱ्यांची नावे जवळपास फिक्स झाली आहेत. मात्र ती जाहीर का होत नाहीत यावरून तर्क वितर्क काढले जात आहेत.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठीच भाजपाने शहर आणि जिल्हाध्यक्षांच्या निवडी केल्या. मात्र त्यानंतर महिना उलटला तरी शहर आणि जिल्हा कार्यकारिणी जाहीर झाली नाही. शहर कार्यकारिणी निवडीवरून नाराजीनाट्य सुरू झाल्याची माहिती आहे. मध्यंतरी आ. विजयकुमार देशमुख आणि आ. सुभाष देशमुख तेलंगणा दौऱ्यावर होते म्हणून कार्यकारिणी लांबल्याची चर्चा होती. ते दोघे दौऱ्यावरून आल्यानंतर चर्चा होऊन शहर सरचिटणीसपदाची नावे जवळपास फायनल झाली आहेत. शहर उत्तरमध्ये दोन तर दक्षिण आणि शहर मध्यसाठी एक सरचिटणीस असे सूत्र ठरले आहे. मात्र ज्यांना हे पद देण्यात येणार आहे, त्यांना महापालिकेसाठी उमेदवारी मिळणार नाही, अशी चर्चा आहे. शहरमध्यसाठी शहराध्यक्ष काळेंचे समर्थक असलेल्या माजी परिवहन सदस्याचे नाव फायनल झाल्याचे समजते. दक्षिणसाठी दुसऱ्या पक्षातून भाजपमध्ये आलेल्याला हे पद देण्यात येत आहे. त्यामुळे निष्ठावंतांमध्ये नाराजी पसरली आहे. त्यामुळेच ही कार्यकारिणी अद्याप जाहीर होत नसल्याची चर्चा आहे.

### शहर उत्तरमधून महिलेला संधी

शहर उत्तरमधून दोन सरचिटणीस निवडले जाणार आहेत. यात एक महिलेचा समावेश असणार आहे. यासाठी दोघांची नावे आघाडीवर आहेत. मात्र हे पद मिळाले तर महापालिकेसाठी उमेदवारी मिळण्याची शक्यता कमी असल्याने या दोन्ही महिलांकडून नकार आल्याची चर्चा भाजपच्या वर्तुळात सुरू आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपण नक्की कोणत्या देशात राहतोय? इंडिया की भारत, असं विचारतोय!

कल्याण
336-25-889

मुंबई
155-14-356

# पंढरपूरच्या उमा महाविद्यालयात सुरु होणार सहकार अध्यासन केंद्र

## राज्यात सहकार समृध्दीचा पहिलाच प्रयोग

सुराज्य/पंढरपूर

येथील पांडुरंग शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने येथील उमा महाविद्यालयात कर्मयोगी स्व. सुधाकरपंत परिचारक सहकार अध्यासन केंद्र या नावाने नवे सहकार व्यासपीठ निर्माण करण्याचा निर्णय विश्वस्त मंडळाने घेतला असल्याची माहिती संस्थेचे विश्वस्त प्रणव परिचारक यांनी दिली. राज्यातील हे पहिलेच सहकार अध्यासन केंद्र आहे.

सहकारातील डॉक्टर म्हणून ख्याती असलेल्या माजी आमदार सुधाकरपंत परिचारक यांनी ४० वर्षाहून अधिक काळ सहकारामध्ये मोठे कार्य केले आहे. याचा संपूर्ण राज्यात आदर्श मानला जातो. यामुळेच त्यांचे नातू प्रणव परिचारक यांनी सर्वसामान्यांची सहकारातून समृध्दी व्हावी, याद्वारे नवीन उद्योग निर्माण व्हावेत यासाठी सदर अध्यासन



केंद्र सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर सहकार केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागातील आणि शहरातील सहकारी संस्थांना बळकटी देणे, सहकारामधील नवे संशोधन करणे, सहकार वृद्धीसाठी नवे प्रकल्प राबवणे, सहकारी कायदे आणि सहकारातील नवी तंत्रज्ञान नवे प्रवाह याविषयी सहकारी संस्थांमध्ये काम करणारे पदाधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षित करणे, सहकाराची ओळख करून देणारा अभ्यासक्रम सर्व वयोगटातील घटकांसाठी सुरू करणे, महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून महिला सहकारी संस्था उभा करणे, केंद्र व राज्य सरकारच्या नव्या सहकारी कायदे व योजनांची माहिती जनतेला करून देणे अशा विविध अजेंड्यांवर हे केंद्र उभारले जाणार आहे.

केंद्राच्या सहकाराच्या माध्यमातून १५२ योजना असून विविध ५५ प्रकारच्या सहकारी ५५ संस्था येतात. मात्र यापैकी फार थोड्या सहकारी संस्थांची माहिती ग्रामीण भागात आहे. याद्वारे ग्रामीण भागात आर्थिक समृध्दी आणणे व सहकार चळवळ वाढविणे हा उद्देश असल्याचे परिचारक यांनी सांगितले. माजी आ. प्रशांत परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली सदर केंद्र कार्यरत राहणार आहे. या पत्रकार परिषदेस माजी प्राचार्य मिलिंद परिचारक, मुकुंद परिचारक, उमेश विरधे, रमेश लाड, राजगोपाल भट्टड, प्राचार्य बाड आदी उपस्थित होते.